गाव तिथे प्रतिनिधी नेमणे आहे..
दैनिक यश सिध्दी न्यूजसाठी महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात गावत तिथे प्रतिनिधी नेमणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२१९८८३५८

दैनिक
# यश सिद्धि न्यूज
RNI NO. MAHMAR/2023/84162
YASH SIDDHI NEWS

वर्ष १ ले | अंक ३३५ वा | गुरुवार २५ एप्रिल २०२४ | पाने ४ | किंमत ४ रु/-
| * Volume 1 | Issue 335 | Date : 25/04/2024 blow Thursday Page 4 Price 4

## मोदींनी २२ अब्जाधीश बनविले, आम्ही कोट्यवधी गरिबांना लखपती बनविणार!

### सोलापुरात राहुल गांधी यांचा घोषणांचा वर्षाव



सोलापूर/प्रतिनिधी : महालक्ष्मी योजनेच्या माध्यमातून देशातील सर्व गरीब कष्टकरी महिलांच्या खात्यात दरवर्षी एक लाख रुपये टाकणार. तसेच श्रीमंतांच्या मुला-मुलींप्रमाणे प्रत्येक पदवीधर मुलाला अप्रेंटिशशीपचा अधिकार मिळवून देणार, हे करताना त्यांना वर्षाला लाख रुपयेही देणार आहे. मोदींनी या देशात केवळ २२ अब्जाधीश बनविले. मात्र आम्ही देशात आता कोट्यवधी लखपती बनविणार आहोत. केंद्रात आमचे सरकार येताच शेतकऱ्यांसाठी कर्जमाफीचा निर्णय घेतला जाईल, शेतकऱ्यांच्या मालाला हमीभाव देण्याचा निर्णय घेतला जाईल अशा अनेकानेक घोषणांचा वर्षाव काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी बुधवारी सोलापूरच्या सभेत केला.

सोलापूर लोकसभा मतदारसंघातील काँग्रेसच्या उमेदवार प्रणिती शिंदे यांच्या प्रचारार्थ बुधवारी राहुल गांधी यांची जाहीर सभा पार पडली. यावेळी । पान २ वर

### तरुणांना लाख रुपयांची अप्रेंटिशशीप

नोटबंदी, जीएसटी लागू करून मोदी सरकारने लूट चालविली. दोन कोटी रोजगार देण्याचे आश्र्वासन देणाऱ्यांनी बेरोजगारी वाढविली. आज सर्वाधिक बेरोजगारी आपल्या देशात आहे. कोट्यवधी लोक रोजगाराच्या शोधात फिरतात. सधन कुटुंबातील लोकांना ही अडचण नाही. ते 'अप्रेंटिशशीप' करतात. सहा महिने, वर्षभराची तात्पुरती नोकरी करतात. हे करण्यासाठी त्यांना पैसे मिळतात. त्यांचा 'जॉब मार्केट'मध्ये शिरण्याचा त्यांचा मार्ग मोकळा होतो. ही संधी साऱ्यांना मिळत नाही. ते भटकत राहतात. हात जोडतात, विनंती करतात. मोदी काय, कुणीच ऐकत नाही. ही परिस्थिती बदलण्यासाठी आम्ही देशात नवा कायदा लागू करणार. त्यामाध्यमातून आजवर सधन कुटुंबातील मुला-मुलींना मिळणारी अप्रेंटिशशीपची सुविधा प्रत्येक बेरोजगारांना उपलब्ध करून देणार असल्याचे राहुल म्हणाले. या मुलांना सर्व क्षेत्रांत ही सुविधा उपलब्ध होऊन वर्षभराच्या नोकरीची गॅरंटी आम्ही देत आहोत. अवघ्या वर्षभरात आपल्या देशात जगातील सर्वांत मोठी 'ट्रेंड वर्क फोर्स' तयार होईल, असा विश्र्वासही राहुल यांनी व्यक्त केला.

## संविधान बदलाची चर्चा हा बाबासाहेबांचा अपमान

### रामदास आठवले यांचा आरोप, दलित मोदींच्या पाठीशी असल्याचा दावा

मुंबई : जोपर्यंत चंद्र आणि सूर्य आहे, तोपर्यंत महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेले संविधान कुणीही बदलू शकत नाही. संविधान बदलण्याच्या चर्चा हाच बाबासाहेबांचा अपमान आहे, असा आरोप रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि केंद्रीय



सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी केला. दलित समाज विकसित भारताचा संकल्प ताकदीने पुढे घेऊन जाणाऱ्या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या पाठीशी असल्याचा दावाही आठवले यांनी पत्रकाद्वारे केला.

आमचे मुक्तिदाते डॉ. आंबेडकर यांचा ज्या काँग्रेस पक्षाने वारंवार अपमान केला, एकदा नाही तर दोनदा निवडणुकीत पराभव केला, त्यांनीच संविधान बदलले जाण्याची चर्चा करणे, हे अतिशय दुर्दैवी आहे. मुळात अशा चर्चा करून दलित समाजाची फसवणूक आता करता येणार नाही. इतकी वर्षे राज्य करण्याची काँग्रेसची जी पद्धत होती, ती आता लागू पडणार नाही. आता आमचा समाज शिक्षित आहे, त्याचे सामाजिक भान जागृत झाले आहे. त्यामुळे काँग्रेस आणि विरोधकांनी कितीही आरोप केले, तरी त्याचा काहीच फायदा होणार नाही, असे आठवले म्हणाले. देशभरातील संपूर्ण दलित समाज ठामपणे मुख्य प्रवाहात येऊन विकसित भारताचे स्वप्न ताकदीने पुढे नेणाऱ्या मोदींबरोबर आहे, असा दावा त्यांनी केला. राजकीय हेतूने कुणी काहीही प्रतिक्रिया दिल्या, तर त्यावर समाज कधीही विश्र्वास ठेवणार नाही. पंतप्रधान नरेंद्र मोदी संविधान बदलणार नाहीत तर ते अधिक मजबूत करीत आहेत. सरकारला संविधान बदलायचे असते, तर लोकसभेत दहा वर्षे संपूर्ण बहुमत आहे, असे आठवले यांनी स्पष्ट केले.

आठवले म्हणाले की, मोदींनी आज विकसित भारताचे स्वप्न पाहिले आहे, त्याचा सर्वाधिक फायदा दलित समाजाला होणार आहे. शेवटच्या माणसाची उन्नती झाल्याशिवाय भारत विकसित होऊच शकत नाही. त्यामुळे गरीब आणि वंचित हे या स्वप्नांचे सर्वात मोठे हकदार असतील. आजही सर्वांसाठी घरे, गॅस, वीज, पाणी यांचे लाभार्थी शेवटचे घटक आहेत. हाच संविधानाचा खरा अर्थ आहे, जोवर शेवटचा माणूस मुख्य प्रवाहात येत नाही, तोवर संविधानाचा संकल्प पूर्ण होणार नाही. तो पूर्ण व्हावा, म्हणूनच आम्ही मोदींबरोबर आहोत.

## निव्वळ संशयावरून हस्तक्षेपाची गरज नाही! ईव्हीएमबाबत सर्वोच्च न्यायालयाचे स्पष्टीकरण

नवी दिल्ली : आम्ही निवडणुकांवर नियंत्रण ठेवू शकत नाही. मतदानयंत्र व व्हीव्हीपॅट संदर्भातील आमच्या शंकांचे केंद्रीय निवडणूक आयोगाने निरसन केले आहे. याबाबत केवळ संशय व्यक्त झाला आहे, या कारणासाठी कोणतेही आदेश देऊ शकत नसल्याचे स्पष्ट करीत बुधवारी सर्वोच्च न्यायालयाने मतदानयंत्रामध्ये फेराफार होण्याची शक्यता फेटाळली व यासंदर्भात दाखल याचिकांवरील निकाल राखून ठेवला.



लोकसभा मतदारसंघाअंतर्गत विधानसभा मतदारसंघांमध्ये प्रत्येकी पाच 'व्हीव्हीपॅट'ची (कागदी पावत्या) पडताळणी होते. त्याऐवजी सर्व व्हीव्हीपॅटची पडताळणी करण्याची मागणी करणारी याचिका 'असोसिएशन फॉर डेमोक्रेटिक रिफॉर्म' (एडीआर) व इतर याचिकाकर्त्यांनी सर्वोच्च न्यायालयामध्ये केली आहे. यासंदर्भात न्या. संजीव खन्ना व न्या. दिपंकर दत्ता यांच्या खंडपीठासमोर बुधवारी सुनावणी पूर्ण झाली. खंडपीठाने बुधवारी काही तांत्रिक मुद्द्यांबाबत केंद्रीय निवडणूक आयोगाकडून स्पष्टीकरण मागितले होते. दुपारी दोन । पान २ वर

## मनोज जरांगेंची प्रकृती बिघडली, छत्रपती संभाजीनगरच्या रुग्णालयात दाखल

मुंबई : महाराष्ट्रात उन्हाचा तडाखा प्रचंड वाढला आहे. उकाडा आणि चटके देणारं उन हा वातावरणात झालेला बदल आहे. तर दुसरीकडे लोकसभा निवडणुकीमुळे राजकीय वातावरणही तापलं आहे. अशात मराठा आंदोलक मनोज जरांगे यांची प्रकृती खालावली आहे. त्यांना छत्रपती संभाजीनगरच्या रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे.



मनोज जरांगे यांनी मराठा आरक्षणासाठी आंदोलन आणि लढा उभा केला. मराठा आरक्षणासाठी त्यांनी उपोषणही केलं होतं. निवडणुकीच्या धामधुमीतही मनोज जरांगे राज्यांतल्या विविध भागांमध्ये दौरा करत आहेत. मनोज जरांगेंच्या प्रयत्नांमुळे महाराष्ट्रात मराठा समाजाला आरक्षण देणारा कायदा लागू झाला. मात्र सगे सोयऱ्यांच्या मागणीवर मनोज जरांगे ठाम आहेत. मराठा समाजाच्या नागरिकांना हा मुद्दा मनोज जरांगे राज्यातल्या विविध भागांत जाऊन समजावून सांगत आहेत. बीड दौऱ्या दरम्यान त्यांनी प्रकृती बिघडली त्यामुळे त्यांना रुग्णालयात दाखल । पान २ वर

## धर्माच्या आधारावर आरक्षणाचा प्रयत्न!

### पंतप्रधान मोदी यांचा काँग्रेसवर आरोप

जयपूर : काँग्रेसने धर्माच्या आधारावर मुस्लिमांना आरक्षण देण्याचा प्रयत्न केला असा आरोप पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केला. तसेच त्या पक्षाने काही ठरावीक लोकांना वाटण्यासाठी जनतेची संपत्ती ताब्यात घेण्याचे व्यापक षड्यंत्र रचल्याचा पुनरुच्चार केला. टोंक येथील सभेत त्यांनी काँग्रेसवर चौफेर टीका केली.

काँग्रेसच्या राजवटीत एखाद्याला आपल्या धर्माचे पालन करणेही कठीण होते. त्यांच्या सरकारमध्ये हनुमान चालीसा पठणही गुन्हा ठरला असा आरोप पंतप्रधानांनी केला. । पान २ वर

## देवेंद्र कोठे यांचा भाजप मध्ये प्रवेश...महेश कोठेंना धक्का

### आ.राम सातपुते यांना भरघोस मतांनी आणणार निवडून : देवेंद्र कोठे यांचा निर्धार



### भाजपाची वाढली ताकद

देवेंद्र कोठे यांच्या भाजपसोबत जाण्याच्या निर्णयामुळे भाजपची ताकद वाढली आहे. लोकसभा निवडणुकीत भाजपा आणि महायुतीचे उमेदवार आमदार राम सातपुते यांना मोठे मताधिक्य मिळवून देण्याचा निर्धार देवेंद्र कोठे यांनी केल्यामुळे शहर मध्य आणि शहर उत्तर मतदारसंघातून भाजपाला मिळणाऱ्या मताधिक्यात वाढ होणार आहे.

सोलापूर/प्रतिनिधीः माजी नगरसेवक देवेंद्र कोठे यांच्या पुढील राजकीय प्रवासाचे पालकत्व मी घेत असून त्यांच्या पुढील सकारात्मक राजकारणाची जबाबदारी माझी असेल. देवेंद्र कोठे यांनी लोकसभा निवडणुकीत पूर्ण ताकदीने भाजप आणि महायुतीचे उमेदवार आमदार राम सातपुते यांच्या प्रचारात सक्रिय व्हावे, असे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

बुधवारी सकाळी नागपूर येथे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची माजी नगरसेवक देवेंद्र कोठे यांनी भेट घेतली. यावेळी भाजपचे शहराध्यक्ष नरेंद्र काळे यांची प्रमुख उपस्थिती होती.

भाजपचे शहराध्यक्ष नरेंद्र काळे म्हणाले, देवेंद्र कोठे हे सोलापूरच्या राजकारणातील आश्र्वासक नेते आहेत. विकासाची जाण असलेले, जनमानसात लोकप्रिय असलेले आणि उत्तम संघटक असलेले देवेंद्र कोठे यांनी भाजपासोबत येण्याचा निर्णय केल्यामुळे भाजपचे आणखी एक पाऊल पुढे पडले आहे. आगामी काळात सोलापुरातील अनेक नेते भाजप आणि महायुती सोबत येणार आहेत. माजी नगरसेवक देवेंद्र कोठे यांचा भाजप आणि महायुतीचे उमेदवार आमदार राम सातपुते यांना पाठिंबा म्हणजे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या विकासकामांना सर्वस्तरातून मिळत असलेल्या कामाची पावतीच आहे.

माजी नगरसेवक देवेंद्र कोठे म्हणाले, माजी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी माझ्या पुढील सकारात्मक राजकीय प्रवासाची जबाबदारी आणि पालकत्व घेतले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या विकासाभिमुख राजकारणाने प्रेरित होऊन आम्ही भाजपा आणि महायुतीचे उमेदवार आमदार राम सातपुते यांना पूर्ण ताकदीनिशी पाठिंबा देण्याचा निर्णय घेतला आहे.याप्रसंगी भाजपचे शहर उपाध्यक्ष जय साळुंखे, रमेश यन्नम आदी उपस्थित होते.



## सोलापुरात वंचितचे राहुल गायकवाडचा राहुल गांधीच्या स्टेजवर काँग्रेसमध्ये प्रवेश

सोलापूर/प्रतिनिधीः सोलापूर लोकसभा मतदार संघातील वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार राहुल गायकवाड यांनी आपला उमेदवारी अर्ज मागे घेतला हा वंचित बहुजन आघाडीसह भारतीय जनता पार्टीला सुद्धा मोठा धक्का बसला आहे

यामुळे माघार नंतर गायकवाड यांनी आपले स्पष्टीकरण देताना संविधान वाचवण्यासाठी ही माघार असल्याचे सांगत भारतीय जनता पार्टीचा माझ्यामुळे फायदा होईल यामुळे आपण माघार घेतल्याचे ते म्हणाले. त्यानंतर सोलापुरात वंचित बहुजन आघाडीच्या उमेदवारामागे माघार का घेतली ही चर्चा घडवली व कट्ट्या कट्ट्यावर ऐकण्यास मिळत या दरम्यान बुधवारी काँग्रेस इंडिया आघाडीचे उमेदवार कोणी ती शिंदे यांच्या प्रचारार्थ काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांची मोठी सभा झाली या सभेत राहुल गायकवाड काँग्रेसच्या स्टेजवर पहिल्या रांगेत बसलेले दिसून आली राहुल गांधी यांच्या उपस्थितीत राहुल गायकवाड यांचा काँग्रेसमध्ये प्रवेश झाला

## संपादकीय

### लोकशाही यंत्रणा खिळखिळी ..

निवडणूक आयोग आणि आचारसंहिता काय असते, हे टी. एन. शेषन यांनी मुख्य निवडणूक आयुक्त असताना देशातील जनतेला दाखवून दिले. त्यानंतर काही वर्षे आयोगाने त्याच पध्दतीने यंत्रणा राबवली. मात्र, गेल्या दहा वर्षांमध्ये स्वायत्त संस्थांमध्ये केंद्र सरकारचा झालेला हस्तक्षेप आणि सरकारच्या मर्जीने निवडलेले अधिकारी या घटनात्मक संस्थांची एक-एक वीट ढासळत आहेत. लोकसभेची निवडणूक देशाचे भविष्य घडवणारी असल्याने याकडे संपूर्ण जगाचे लक्ष वेधले आहे. ही निवडणूक निष्पक्ष, निर्भय आणि मुक्त वातावरणात पार पाडली पाहिजे. त्यासाठी दक्ष असलेल्या आयोगाने अनेक हालचालींवर लक्ष ठेवले आहे. मतदारांना पैसे वाटणे, मतदारांवर प्रभाव पडेल असे विधान करणे आणि जाती व धर्माच्या आधारावर मते मागणे, हे निवडणूक आयोगाला मान्य नाही. ते कायद्याच्या कक्षेत बसत नसल्याने आचारसंहितेचा भंग होऊ शकतो. याच कारणावरुन उध्दव ठाकरे यांच्या शिवसेनेने प्रचारात आणलेले प्रेरणागीत वादात सापडले आहे. 'शंखनाद होऊ दे, रणदुदुंभी वाजू दे, नाद घोष गर्जू दे विशाल' या मशालगीतात एकदा 'जय भवानी' व हिंदू हा शब्द वापरण्यात आला आहे. त्यावर निवडणूक आयोगाने आक्षेप घेऊन जय भवानी व हिंदू शब्द हटवण्यास ठाकरे यांना नोटीस धाडली आहे. जय भवानी आणि जय शिवराय या घोषणा आजच दिल्या जात नाहीत तर त्या अनेक वर्षांपासून दिल्या जातात. त्यामुळे जय भवानी हा शब्द कोणत्याही परिस्थितीत हटवणार नाही. उद्या आयोग 'जय शिवराय' म्हणण्यासही बंदी घालेल, हे कदापि खपवून घेणार नाही. उलट जय बजरंगबलीच्या नावावर मते मागणारे पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि भाजपला मत दिल्यास रामलल्लाचे मोफत दर्शन घडवू असे विधान करणारे अमित शहा आणि मतदान यंत्रात कचाकचा बटणे दाबा, पाहिजे तेवढा निधी देऊ असे आमिष दाखवणाऱ्या अजित पवार यांच्यावर अगोदर कारवाई करा, असे खुले आव्हान ठाकरे यांनी आयोगाला दिले आहे. ठाकरे यांनी दिलेले आव्हान स्वीकारुन आयोग मोदी आणि शहा यांना नोटीस बजावून खुलासा मागवेल यावर कुणाचाही विश्र्वास बसणार नाही. मात्र, चौकशी यंत्रणांप्रमाणेच आयोग विरोधकांची मुस्कटदाबी करीत असल्याचे चित्र उभे राहाणे हे लोकशाहीसाठी धोकादायक आहे. सत्ताधारी किंवा विरोधक या दोन्ही पक्षांना आयोगाने सारखीच वागणूक द्यायला हवी. अन्यथा आयोगाच्या निष्पक्षतेला गालबोट लागले तर लोकशाही यंत्रणा खिळखिळी होईल.

पान १ वरुन

### मोदींनी २२ अब्जाधीश बनविले..

राहुल गांधी यांनी नरेंद्र मोदी यांच्यावर टीका केली. नरेंद्र मोदींनी आपल्या अब्जाधीश मित्रांचे १,६०,००,००,००,००,००० रुपयांचे म्हणजेच १६ लाख कोटी रुपयांचे कर्ज माफ केले आहे!

१६ लाख कोटी रुपयांमध्ये काय होऊ शकत*

-१६ कोटी तरुणांना वर्षाला एक लाख रुपयांच्या नोकऱ्या मिळाल्या असत्या

-१६ कोटी महिलांना वर्षाला १ लाख रुपये देऊन त्यांच्या कुटुंबीयांचे जीवन बदलू शकले असते.

-१० कोटी शेतकरी कुटुंबांचे कर्ज माफ करून असंख्य आत्महत्या रोखता आल्या असत्या.

-संपूर्ण देशाला २० वर्षांसाठी फक्त ४०० रुपयांत गॅस सिलिंडर देता येईल, असेही राहुल गांधी यावेळी म्हणाले. दरम्यान, काँग्रेस सत्तेत आल्यावर कोणकोणत्या योजना राबवणार याचीही माहिती दिली.

यावेळी व्यासपीठावर महविकास आघाडीच्या उमेदवार प्रणिती शिंदे, माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे, उज्वलाताई शिंदे, काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, काँग्रेसचे ज्येष्ठ नेते बाळासाहेब थोरात, माढा मतदारसंघाचे उमेदवार धैर्यशील मोहिते पाटील, माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण, धर्मराज काडादी, निवडणूक प्रमुख प्रकाश यलगुलवार, चेतन नरोटे, माजी गृहराज्यमंत्री सिद्धाराम म्हेत्रे, दिलीप माने, नरसय्या आडम मास्तर, शिवसेना नेते अजय दासरी, आमदार वझाहत मिर्झा, वंचितचे उमेदवारी अर्ज मागे घेतलेले राहुल गायकवाड, उत्तमराव जानकर , भगीरथ भालके, अभिजित पाटील, सुरेश हसापूरे, बाबा मिस्त्री, विश्र्वनाथ चाकोते, जिल्हा अध्यक्ष नंदकुमार पवार, महेश कोठे, सुधीर खरटमल, आम आदमी पार्टीचे एम पाटील, समाजवादी पार्टीचे अबू तालिब डोंगरे, मनोहर सपाटे, मनोज यलगुलवार, अशोक निंबार्गी, संजय हेमगड्डी, जुबेर कुरेशी, यांच्यासह महाविकास आघाडीच्या नेत्यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी महाविकास आघाडीच्या उमेदवार प्रणिती शिंदे बोलताना म्हणाल्या की, भाजपने मागील दहा वर्षात सोलापूरला मागे नेले. आपल्याला त्याचा बदला घेवून सोलापूरला विकासाच्या वाटेवर न्यायचे आहे. तसेच भारतीय जनता पक्षाने जी जाती धर्मात कीड लावली आहे. ती कीड मुळापासून उखडून काढायची आहे. तसेच भाजपला सोलापूरची संस्कृती दाखवून द्यायची आहे. त्यासाठी सर्वांनी एक होऊन मतदान करत सोलापूरच्या लेकीला दिल्लीत पाठवण्यासाठी साथ देण्याचे आवाहन केले.

## स्वलिखित हास्यलेख

### साहित्यिकांचे भावविश्व

साहित्य नटवावे तेवढे नटु शकते. सजवावे तेवढे सजु शकते. साहित्याचे विविधरंग प्रेम, श्रृंगार, कौर्य, बिभत्स, शालिन, सामाजिक, भावनिक असे असतात. त्यातप्रमाणे साहित्यिकांचे भावविश्र्वही अनेकविध असतात. साहित्यिक हे विविधरंगी भावभावनांच्या लाटेवर तरंगत असतात.

कोणी व्यक्ति चित्रविचित्र बोलु लागली तर विशेष प्रश्र्न पडु न देता तपासावे हा/ही साहित्यिक तर नाही? साहित्यिक थोडे हळवे असतात. काही विद्रोही असतात तर काही प्रचंड प्रेमळही असतात. लोकांचा मात्र प्रचंड गैरसमज होतो. कारण साहित्यविश्र्वात रमलेले कवि लोक सत्यात येताच तणावात जातात. त्याचे बदलते बोलणे व वागणे लोकांना संभ्रमांत टाकते. कविमनात साठलेल्या प्रश्र्नांची उकल स्वप्नातच सुटते. सत्याची व जगाची प्रखरता स्वप्नांना जोरदार तडे बसवते. मग कवि/लेखक लोक कधी नरम नरम तर कधी गरम गरम.

कवि लोकांचे कोणाला काहीच कळत नाही. कधी गालातल्या गालात स्वताशीच हसत असतात. मग पतींना बघुन पत्नी म्हणते, काय हो किती बघणार त्या अप्सरेला? की सवत बिवत करुनच आणताय घरात?. आता यावर सगळा मुडच गेलेला कवि बिचारा काय बोलणार सांगा?

तसेच लेखिकेचा नवरा तिचा फोन एकटक बघता बघता एक भुवई उंचावुन म्हणतो, हा कोण गं तुझा प्रतेक वेळी बदाम पाठवतो. आज तर चार आलेत. यावर गृहीणी कडे उत्तर तरी आहे का?

अजुनही हास्यास्पद किस्से आहेत बरं!!

आईची कविता वाचुन मुलगी म्हणते, अग ये ही प्रेमकविता तु लिहलिस? कोणाच्या प्रेमात ब्रिमात पडलिस की काय? ह्या वयात? बाबांना घटस्फोट देते आहेस की काय? तरुणांची नवलाई आईचे वय दिसते मन नाही.

मुलगा म्हणतो, आई ह्या मुलाचे जरा जास्तच रिप्लाय असतात गं.... याला वय बिय काही कळत नाही का गं, तुला स्वीटहार्ट कसा म्हणु शकतो गं हा? आता आईकडे गप्प बसण्या पलिकडे उपायच नाही.....एकदा एक कवि दुसर्या कवियित्रीला म्हणाला, मॅडम छानशी साडी नेसुन, केसात गजरा माळुन, फोटो काढा. व डीपी ला लावा. तुमच्या कडे बघुन मला प्रेरणा मिळते. वॉटसअप मैसेज वाचताच पतींनी फोनच लावला, का रे बाबा. जगात दुसरी प्रेरणाच नाही का तुला. मला एकच आहे. टिकु दे ती माझ्या कडेच... जा दुसरीकडे शोध. तुला ब्लॉकच करतो.

*आता अश्या प्रकारे संशय मनमनात जागा करु लागला तर कविमनांनी स्फुर्ती घ्यावी कोठुन? असा शाब्दिक मारा सहन करत बिच्चारे साहित्यिक मनाच्या कोंडमार्यात दिवस काढत असतात. सहमत असाल तर सांगा.मला सांगा एकच चित्र/फोटो बघुन कोण किती दिवस? आणी किती प्रेरणा घेणार? मग लिखाणासाठी साहित्यिक तरुण, वयस्कर, आबालवृद्ध सर्वांचेच मनाचे कंगोरे न्याहळत, गप्पाटप्पा करीत, कधी गरज नसताना विषय वाढवित, कधी थट्टामस्करी करीत, तर कधी कधी सरळ सरळ लाईन मारीत वा प्रपोज करीत लिखाणासाठी वातावरण निर्मिती करीत असतात.

*आता तुमच्यासाठी काय पण तसेच साहित्यिकांना



लिखाणासाठी काय पण करावे लागत असेन तर त्यात वावगे काय आहे?गैरसमज नको पण तरीही काय म्हणाल व किती हसाल तुम्ही माझ्या ह्या मत मतांवर?*

**-किर्तीसंध्या**

**मो.७०८३३५१७२५**

महालक्ष्मी योजना राबवणार

दरम्यान राहुल गांधी आपल्या भाषणात बोलताना पुढे म्हणाले की, आजच्या २१व्या शतकात महिला आणि पुरुष असे दोघेही काम करतात. आठ-दहा तासांची दोघांचीही नोकरी होते. महिला घर आणि बाहेर अशा दोन्हीकडे आठ-आठ तास काम करतात. घरात जेवण तयार करणे, मुलांचे संगोपन करताना देशाच्या भविष्याचे रक्षण करते. तरीही केवळ आठ तासांचे पैसे मिळतात. घरकामाचे पैसे दिले जात नाहीत. म्हणून महालक्ष्मी योजनेच्या माध्यमातून प्रत्येक गरीब कुटुंबातील महिलेला बळ देणार, त्यासाठी गरीब महिला कुटुंबाची यादी काढून त्यातील कुटुंबप्रमुख महिलांना प्रतिवर्षी एक लाख रुपये खात्यात टाकणार असल्याचे आश्र्वासनही यावेळी राहुल गांधी यांनी दिले.

शेतकऱ्यांसाठी कर्ज माफी योजना

शेतकरी मोदी सरकारकडे कर्जमाफी आणि हमीभाव मागत होते. मात्र त्यांनी तो दिला नाही. परंतु शेतकऱ्यांनो तुम्ही चिंता करू नका. महिला, बेरोजगारांना दिले जाणारे एक-एक लाख तुमच्याच घरात येणार आहेत. मोदी सरकारने तुमचे कर्ज माफ केले नाही. आमचे सरकार येताच कर्जमाफी केली जाईल. हे केवळ एकदा नव्हे तर गरज पडेल तेव्हा ही कर्जमाफी दिली जाईल. हे ठरविण्यासाठी विशेष आयोग स्थापन करणार. तो आयोग सांगेल तेव्हा-तेव्हा शेतकऱ्यांना कर्जमाफी मिळणार. जर अब्जाधीशांचे कर्ज माफ होऊ शकते तर गरिबांचे का नाही, असा सवालही राहुल यांनी यावेळी केला. आपल्याकडे पैशांची कमी नाही. अब्जाधीशांच्या गाड्या, घर, विमाने पाहिल्यानंतर हे पटते, असेही ते म्हणाले.

९० टक्के लोकांना सहा टक्केच अधिकार

आपल्या देशातील १५ टक्के दलित, आठ टक्के आदिवासी, ५० टक्के मागासवर्ग, १५ टक्के अल्पसंख्याक, पाच टक्के आर्थिकदृष्ट्या मागास असे ९० टक्के लोक आहेत. माध्यमे, उद्योजकांमध्ये हे कुठेही नाहीत. अदानी, अंबानींसारख्या २०० प्रमुख उद्योजकांच्या कंपन्यांमध्ये वरिष्ठ पदांवर यांच्यापैकी कुणी नाहीत. या कंपन्यांचे मालक दलित, ओबीसी नाहीत. दिल्लीतील सरकार ९० अधिकारी चालवितात. हे आयएएस दर्जाचे असतात. बजेटमधील एक-एक रुपयाचा निर्णय घेतात. रस्ते, रेल्वे, डिफेन्स अशा प्रत्येक क्षेत्रासाठीचा निधी ठरवितात. हे ठरविणाऱ्या अधिकाऱ्यांमध्ये फक्त एक आदिवासी आहे. ओबीसी आणि दलितांची संख्या प्रत्येकी तीन आहे. म्हणजेच केवळ शंभरातील सहा रुपयांचा निर्णय घेण्याची क्षमता यांच्याकडे असल्याकडेही राहुल यांनी लक्ष वेधले.

'जीएसटी वरून टीका

राहुल यांनी आपल्या भाषणात जीएसटी चा मुद्दा ही उपस्थित केला. एखादी वस्तू घेणार असाल तर १८ टक्के जीएसटी तुम्ही देता. मात्र इतकाच जीएसटी अदानी, अंबानीही देत असल्याचेही सांगत जीएसटीच्या माध्यमातून सर्वसामान्याचे होणारी लूट कशा पद्धतीने होते याकडेही लक्ष वेधले. तसेच दलित, मागास, अल्पसंख्यांकांचा हा पैसा असतानाही कर्जमाफी फक्त २२ लोकांनाच का दिली गेली, असा सवालही राहुल यांनी केला.

**लक्षवेधी...**

-शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसाठी आयोगाची स्थापना करणार. या आयोगाच्या माध्यमातून ज्या ज्या वेळी कर्जमाफीची गरज असेल त्या त्यावेळी शेतकऱ्यांना कर्जमाफी देणार

- जितका पैसा ते अब्जाधीशांना देणार, तितका आम्ही शेतकरी, दलित, आदिवासी, मागास वर्ग देणार.

- एक लाख बँक खात्यात टाकणार हे सांगताना 'खट खट खट खट पैसा बँकेत येणार असा उच्चार करताच जनतेचा टाळ्यांनी उस्फुर्त प्रतिसाद' दिला..

- यावेळी भरउन्हातही मोठ्या प्रमाणात नागरिकांची सभेला गर्दी केल्याचे चित्र यावेळी पाहायला मिळाले.

### निव्वळ संशयावरून हस्तक्षेपाची ..

वाजेपर्यंत आयोगाने चारही मुद्दयांवर भूमिका स्पष्ट केल्यानंतर खंडपीठाने मतदानयंत्राद्वारे होणाऱ्या निवडणूक प्रक्रियेमध्ये हस्तक्षेप करण्यास नकार दिला. मतपेटीद्वारे मतदान घेण्याची शक्यताही खंडपीठाने फेटाळली. मतदानयंत्र व या यंत्रांना जोडलेल्या 'व्हीव्हीपॅट' मशीनमध्ये फेराफार करता येत नाहीत, असे आयोगाने न्यायालयाला सांगितले. त्यावर, 'एडीआर'च्या वतीने ज्येष्ठ वकील प्रशांत भूषण यांनी, मतदानयंत्रांच्या कार्यप्रणालीमध्ये बदल करता येऊ शकतो, असा मुद्दा उपस्थित केला. त्यावर, निवडणूक आयोगाने सर्व शंकांचे निरसन केले असून केवळ शंकेच्या आधारे निवडणूक प्रक्रियेमध्ये बदल करता येणार नाहीत, असे न्यायालयाने स्पष्ट केले.

संकेतप्रणाली गोपनीयच !

मतदानयंत्रांच्या कार्यप्रणालीमध्ये फेरफार केले जाऊ शकतात वा कार्यप्रणाली नव्याने अपलोड केली जाऊ शकते असा मुद्दा उपस्थित करून मतदानयंत्रातील संकेतप्रणालीचा स्रोत (सोर्स ऑफ कोड) उघड करण्याची मागणी करण्यात आली. मात्र, संकेतप्रणालीचा स्रोत गोपनीयच ठेवला जाईल. अन्यथा त्याचा गैरवापर केला जाण्याचा धोका असू शकतो, असे न्या. खन्ना यांनी स्पष्ट केले.

न्यायालयाचे पाच प्रश्र्न व आयोगाची उत्तरे

* मायक्रो-कंट्रोलर कंट्रोल युनिटमध्ये असते की व्हीव्हीपॅटमध्ये? * कंट्रोल युनिट, बॅलेट युनिट, व्हीव्हीपॅट यांचे स्वतंत्र मायक्रो-कंट्रोलर आहेत. मायक्रो-कंट्रोलरच्या मेमरीमध्ये कार्यप्रणाली अपलोड होते. हे मायक्रोकंट्रोलर सुरक्षित, अनधिकृत एक्सेस-डिटेक्शन मॉड्यूलमध्ये ठेवलेले असल्यामुळे नियंत्रकांना त्यामध्ये बदल करता येत नाही. * कार्यप्रणाली एकदाच प्रोग्राम करता येते का? * मायक्रो-कंट्रोलरमध्ये फक्त एकदाच कार्यप्रणाली अपलोड होते. त्यानंतर त्यामध्ये फेरफार करता येत नाहीत. * निवडणूक चिन्हे अपलोड करणारी किती युनिट्स आहेत? * इलेक्ट्रॉनिक कॉर्पोरेशन ऑफ इंडिया (ईसीआयएल) व भारत इलेक्ट्रॉनिक्स (बीईएल) या सरकारी कंपन्या मतदानयंत्रांचे उत्पादन करतात. 'ईसीआयएल'कडे १,९०४ तर, भेलकडे ३,१५४ चिन्हे अपलोड करणारी युनिट्स आहेत. * माहिती-विदा किती दिवस साठवून ठेवला जातो? * मतमोजणीनंतर ४५ दिवसांमध्ये निकालाविरोधात आक्षेप घेता येतो. त्यामुळे ४६व्या दिवशी आक्षेप नसलेल्या मतदानयंत्रांतील माहिती-विदा नष्ट केला जातो. * कंट्रोल युनिट व व्हीव्हीपॅट सील केले जातात का? यंत्रे एकत्र ठेवली जातात की स्वतंत्रपणे? * तिन्ही युनिट्स सील करून एकत्रितपणे सुरक्षित ठेवली जातात.

### धर्माच्या आधारावर ..

मंगळवारी हनुमान जयंती असल्याचा संदर्भ येथे होता. काँग्रेसने २००४ मध्ये केंद्रात सरकार स्थापन केल्यानंतर आंध्र प्रदेशात अनुसूचित जाती-जमातींचे आरक्षण कमी करून ते मुस्लिमांना दिले. मात्र आमच्या सरकारमध्ये दलित-आदिवासींचे आरक्षण बंद होणार नाही किंवा धर्माच्या आधारावर भेद केला जाणार नाही ही मोदींची हमी असल्याचे स्पष्ट केले. संपत्तीच्या फेरवाटपाचा मुद्दा पंतप्रधानांनी पुन्हा उपस्थित करत, काँग्रेस संपत्ती हिरावून काही ठरावीक लोकांना देईल असा आरोप केला.

काँग्रेसने २००४ केंद्रात सरकार स्थापन झाल्यावर आंध्रमध्ये अनुसूचित जाती-जमातींचे आरक्षण कमी करून मुस्लिमांना दिले. देशभर त्यांना हे प्रारूप लागू करायचे होते. २००४ ते २०१० या काळात चार वेळा त्यांनी आंध्र प्रदेशात मुस्लिमांना आरक्षण देण्याचा प्रयत्न केला. मात्र कायदेशीर अडचणींमुळे त्यांना हे लागू करता आले नाही. २०११ मध्ये काँग्रेसने हे प्रारूप देशभर लागू करण्याचा प्रयत्न केला. अनुसूचित जाती-जमाती तसेच इतर मागासवर्गीयांचे आरक्षण मतपेढीच्या राजकारणासाठी इतरांना देऊ केले. त्या वेळी घटनेची तसेच बाबासाहेब आंबेडकरांची त्यांना चिंता नव्हती अशी टीका पंतप्रधानांनी केली. कर्नाटकमध्ये जेव्हा भाजप सरकार आले त्या वेळी पहिल्यांदा आम्ही मुस्लीम आरक्षण रद्द केले.काँग्रेस तसेच त्यांच्या मित्रपक्षांचे मतपेढीचे राजकारण उघड झाल्याचा आरोप बंसवरा येथील सभेत पंतप्रधानांनी केला. आम्ही काँग्रेसवर आरोप करताच त्यांचा थयथयाट सुरू झाला असा टोला मोदींनी लगावला.

### मनोज जरांगेंची प्रकृती..

करण्यात आलं आहे. छत्रपती संभाजीनगर या ठिकाणी असलेल्या गॅलेक्सी रुग्णालयात त्यांच्यावर उपचार सुरु आहेत.

मराठा नेते मनोज जरांगेंची प्रकृती बिघडली आहे. मनोज जरांगे यांना छत्रपती संभाजीनगरच्या गॅलक्सी रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. मनोज जरांगे बीड जिल्ह्याच्या दौऱ्यावर होते. या दौऱ्यादरम्यान अचानक त्यांची प्रकृती बिघडली आहे. त्यांना आता छत्रपती संभाजीनगरच्या गॅलक्सी रुग्णालयात आणण्यात आलं आहे. त्यांच्यावर आता उपचार सुरु आहेत. उपोषणामुळे मनोज जरांगे यांची प्रकृती बिघडल्यानंतर त्यांना याआधी गॅलक्सी रुग्णालयात दाखल करण्यात आलं होतं. पण ते सध्या उपोषणाला बसले नव्हते. त्यामुळे त्यांना उन्हाचा त्रास झाल्याचा अंदाज आहे. मनोज जरांगे लवकर बरे व्हावेत, अशी प्रार्थना त्यांच्या समर्थकांकडून आणि समस्त मराठा समाजाकडून केली जात आहे.

## येडोळा येथे भव्य मिरवणूकीने डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती उत्सवाची सांगता

वागदरी/ एस.के.गायकवाड: मौजे येडोळा ता.तुळजापूर येथे भारतीय घटनेचे शिल्पकार महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३३ व्या जयंती उत्सवाची सांगता विविध उपक्रमाने व भव्य मिरवणूकीने करण्यात आली.



डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव कमिटी व सिध्दार्थ कला व क्रिडा मंडळ येडोळा ता.तुळजापूरच्या वतीने डॉ बाबासाहेब आंबेडकर १३३ व्या जयंती उत्सवाच्या निमित्ताने येडोळा येथे विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

शेवटी गावातून महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेची सह वाद्या भव्य मिरवणूकीने या जयंती उत्सवाची सांगता करण्यात आली. प्रारंभी गावचे माजी सरपंच पद्माकर पाटील, सामाजिक कार्यकर्ते शिवाजी जाधव,प्रभाकर पाटील, दिगंबर पाटील,मेजर राजेंद्र जाधव, रणजीत परिवार,जयंती उत्सव कमिटी अध्यक्ष सुरेश लोंढे, देवानं लोंढे यांच्या हस्ते भारत रत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करुन मिरवणुकीस सूरवात करण्यात आली.या प्रसगी जय सेवालाल मंडळासह गावातील विविध क्षेत्रातील मान्यवरांनी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करुन अभिवादन केले.या मिरवणुकीत वागदरी,हंगरगा(नळ), आष्टा (कासार),घोळसगाव,धानुरी आदी गावातील लेझीम पथक सहभागी झाले होते.

यावेळी फुले शाहू आंबेडकर विध्वत महासभेचे जिल्हा समन्वयक कैलास गवळी गुरुजी,डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव कमिटी वागदरीचे अध्यक्ष संदीपान वाघमारे, कार्याध्यक्ष अनिल वाघमारे, रिपाइं (आठवले) चे जिल्हा सचिव एस.के.गायकवाड,सह गावातील मान्यवर महिला पुरुष युवा कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मिरवणुकीच्या यशस्वी होण्यासाठी जयंती उत्सव कमिटीचे सुरज गायकवाड, अमित लोंढे,रामचंद्र लोंढे, डॉ.सुरज लोंढे,अमर जेटीथोर,प्रविण कांबळे, अंकुश लोंढे, मारुती लोंढे, जितेंद्र लोंढे,भानुदास लोंढे, अभिषेक लोंढे,सह कार्यकर्ते यांनी परिश्रम घेतले.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

# घराघरात ग्रंथालय उभारणे हेच डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना खरे अभिवादन..!

पुणे : भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे ज्ञानाचे प्रतिक असुन त्यांनी लिहिलेल्या द प्रॉब्लेम ऑफ रुपी या पुस्तकावरच देशाचे व जगाच्या अर्थकारणाला दिशा मिळाली असुन प्रत्येक व्यक्तीच्या घराघरात पुस्तके, ग्रंथालय असले पाहिजेत ग्रंथालय हे प्रेरणा व जीवनाला दिशा देतात त्यामुळे आपण आपल्या उद्दिष्टांपर्यंत पोहोचतो डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची चळवळ ही विचाराची पुस्तकांची आपल्या प्रगतीची चळवळ असुन घराघरात ग्रंथालय उभारणे हेच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना खरे अभिवादन असल्याचे मत बार्टी संस्थेचे महासंचालक श्री. सुनिल वारे यांनी बोलतांना व्यक्त केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे संस्थेच्या वतीने २३ एप्रिल २०२४ रोजी जागतिक पुस्तक दिनानिमित्त बार्टी ग्रंथालयाच्या वतीने बार्टी सभागृहात वाचण प्रेरणा दिन साजरा करण्यात आला.



डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस मा. महासंचालक सुनिल वारे यांच्या हस्ते पुष्पमाला अर्पण करून अभिवादन करण्यात आले.निबंधक श्रीमती इंदिरा अस्वार, विभागप्रमुख वषाली शिंदे, अनिल कारंडे यांनीही अभिवादन केले.श्री. सुनिल वारे यांच्या हस्ते बार्टीतील सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांना जागतिक पुस्तक दिनानिमित्त द प्रॉब्लेम ऑफ रुपी हा ग्रंथ भेट देण्यात आला.विभागप्रमुख श्रीमती वृषाली शिंदे यांनी जागतिक पुस्तक दिनानिमित्त शुभेच्छा दिल्या.

दुसऱ्या सत्रात विस्तार व सेवा आयबीपीएस विभागाचे विभाग प्रमुख डॉ. सत्येंद्रनाथ चव्हाण यांनी वाचन प्रेरणा दिनानिमित्त मार्गदर्शन करताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर हीच आमची प्रेरणा ऊर्जा असून याच महामानवाने या देशातील महिलांना न्याय मिळवून देण्यासाठी हिंदु कोड बिल मांडले तसेच या देशाचे संविधान लिहुन उपेक्षित वंचित शोषित पिडीतांना न्याय दिला असल्याचे सांगून ग्रंथपाल वैशाली खांडेकर यांचे तसेच प्रकाशन व प्रसिद्धी, समतादुत विभागातील टिमचे अभिनंदन केले.बार्टीतील सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी वाचन प्रेरणा दिनानिमित्त पुस्तकाचे वाचन करून महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन केले.प्रास्ताविक सुत्रसंचलन ग्रंथपाल वैशाली खांडेकर यांनी केले.आभार रामदास लोखंडे यांनी मानले.

# श्रमिकांच्या जीवावर ठेकेदारांची बरकत; मजुरांकडून केली जाते जीवघेणी कसरत

तालुका प्रतिनिधी/गौरवकुमार इंगळे

मंगरूळपीर येथे महाराष्ट्र जीवन प्राधिकरण च्या जलजीवन मिशन अंतर्गत होत असलेल्या पाणीचे टाकी बांधकामावरील धक्कादायक अपघात.

लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांनी म्हटले आहे की पृथ्वी ही शेषनागाच्या मस्तकावर तरलेली नसून दलित व कामगारांच्या तळहातावर तरलेली आहे. परंतु याच कामगार वर्गाला शेषनागाप्रमाणे डसणाऱ्या मस्तवाल यंत्रणेला मात्र मजुरांच्या दुःखावर झालर टाकण्याची सवयच लागलेली आहे. महाराष्ट्र जीवन प्राधिकरण अंतर्गत जल जीवन मिशन चा उपक्रम मंगरूळपीर तालुक्यातील शहापूर सोनखास या गट ग्रामपंचायत मध्ये सुरू आहे. या उपक्रमांतर्गत कोट्यावधी रुपये खर्च करून या ठिकाणी पाण्याची टाकी उभारण्यात आली आहे व सद्यस्थितीत काम प्रगतीपथावर आहे. सदर प्रकल्पावर काम करण्याकरीता कंत्राटदार यंत्रणेने बाहेर जिल्ह्यातून मजूर बोलावले.त्यांचे माध्यमातून काम सुरू केले. काम सुरू असताना दुर्दैवाने २४ फेब्रुवारी २०२४ रोजी पाण्याच्या टाकीच्या संबंधीत एका युनिटचे बांधकाम सुरू असताना ताकीब खान नामक एक मजूर वय २० ,उंचीच्या ठिकाणावरून पाय घसरून खाली पडला त्याचे डोक्याला व हाताला जबर मार लागल्याने त्याला ग्रामीण रुग्णालय मंगरूळपीर व तेथून पुढे जिल्हा सामान्य रुग्णालय अकोला व तेथून पुढे सुपर स्पेशलिटी हॉस्पिटल नागपूर या ठिकाणी पुढील उपचारासाठी नेण्यात आले. सदर मजुरावर एक शस्त्रक्रिया पार पडली व दुसरी शस्त्रक्रिया करण्यासाठी डॉक्टरांनी पुन्हा त्यास नागपूरला बोलावून घेतले. अत्यंत हलाखीच्या परिस्थितीत जीवन जगत असलेल्या या मजूर वर्गाला अशा जीव घेण्या कसरती करत असताना कुठल्याही प्रकारच्या सुरक्षा व्यवस्था पुरवल्या गेल्या नसल्याची खंत त्यांचे पालकांनी व्यक्त केली. प्रशासन व कंत्राटदार यांचे कडून कुठलीही ठोस मदत या कुटुंबाला आजवर झाली नाही तसेच सदर अपघात ग्रस्त मजुराची स्थिती दयनीय आहे असे असताना सुद्धा केवळ म्बुलन्स चा खर्च कंत्राटदाराकडून सदर मजुराच्या पालकाला मिळाला असल्याची खंत त्यांनी व्यक्त केली. अनेक वेळा कंत्राटदाराला बोलून सुद्धा कुठल्याही







प्रकारची मदत प्रशासन कडून मिळाली नसल्याने त्यांचे पालकांनी थेट पोलीस स्टेशन मंगरूळपीर या ठिकाणी संपर्क साधला यावर मंगरूळपीर पोलिसांनी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण ला पत्र देत कंत्राटदार यंत्रणेबद्दल विचारणा केल्याचे कळते. कंत्राटदार कोण आहे हे माहीत करून घेण्यासाठी तक्रारदाराचे मत विचारत न घेता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण चे अधिकाऱ्यांना पत्राद्वारे विचारणा करणे म्हणजे प्रक्रियेत निश्रि्चतच विलंब होतो.मात्र त्यावर कुठलीही ठोस कार्यवाही आजवर झालेली दिसत नाही. त्यामुळे सदर पालकांनी १८ एप्रिल २०२४ रोजी वाशिम जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी,वाशिम जिल्हा पोलीस अधीक्षक, तसेच जिल्हा कामगार अधिकारी वाशिम यांच्याकडे धाव घेत रीतसर तक्रार नोंदवली. त्यांनी दिलेल्या तक्रारीनुसार असे कळते की खालील खान अब्दुल खान वय अंदाजे ६० वर्ष राहणार जिंतूर हे त्यांचे दोन मुले ताकिब खान आणि आसिफ खान यांचे सह सदर प्रकल्पावर मजूर म्हणून काम करत होते त्या ठिकाणी सुरक्षेच्या कुठल्याही व्यवस्था नसताना सुद्धा मजुरांना जीव घेणे काम करायला भाग पाडले जायचे. उंचीवरच्या अशा ठिकाणी जिथे उभे राहणे सुद्धा कठीण आहे तिथे दिवसभर काम करायला लावणे हे कितपत योग्य आहे. डोक्यावरचे हेल्मेट ,सेफ्टी बेल्ट,हातापायात मोजे, पायातील सुरक्षीत जोडे अशा गोष्टींची वारंवार मागणी करून सुद्धा अशा कुठल्याही गोष्टी कंत्राटदार यंत्रणेंनी मजुरांना पुरवल्या नाहीत. सुरक्षेच्या अपुरे यंत्रणेमुळे झालेल्या अपघाताची तीव्रता जास्त असल्याची तक्रार खालील खान यांनी केली आहे.

तरी सदर यंत्रणे कडून किंवा प्रशासनाकडून मदत मिळण्यासाठी त्यांनी निवेदन दिले.

संबंधित ठेकेदारावर कार्यवाही करण्याची मागणी खालील खान यांनी केली.तरी अपघात ग्रस्त मजुराला विमा लागू आहे का असा सवाल महाराष्ट्र जीवन प्राधिकरणचे अधिकाऱ्यांना विचारल्यावर त्यांनी गोंधळलेली उत्तरे दिली. ठेकेदाराकडून प्रशासनाने एग्रीमेंट करत असताना मजुराच्या जीवाची काळजी घेण्यासाठी कंत्राटदार वचनबद्ध नाही का किंवा जीवघेणी कसरत करत रोजी रोटी कमावणाऱ्या मजुराला विम्याचे संरक्षण नाही का असा सवाल या ठिकाणी उपस्थित होत आहे. कुठल्याही प्रकारच्या विम्याचा फायदा सदर कुटुंबाला आजपर्यंत मिळाला नाही. दुसरी शस्त्रक्रिया करण्यासाठी सदर अपघातग्रस्त मजूर व त्यांचा परिवार सुपर स्पेशलिटी हॉस्पिटल नागपूर येथे खस्ता खात आहे.

# जीवात जीवमान असेपर्यंत जनतेची सेवा करू: धर्यशील मोहिते पाटील



माढा/प्रतिनिधीः विजय दादा आबासाहेब मालक यांनी जिल्ह्यामध्ये राजकारणात करताना पक्ष भेद बाजूला ठेवून विकास कामे केली हा विकास कामाचा कसा आमच्या आजोबा शंकरराव मोहिते पाटील यांच्यापासून आलेला आहे व मी खोटे आश्र्वासने एवढी खोटी आणतो असे देणार नाही व शंकरराव मोहिते पाटील आबासाहेब व विजयदादा यांची नाव खराब होईल असे काम करणार नाही तर मनापासून सेवा करीन आपल्या सेवेत राहील त्यामुळे विकास कामासाठी जनतेच्या सेवेसाठी जिवात ह्युमन असेपर्यंत जनतेची सेवा करू असे मत इंडिया आघाडीचे माढा लोकसभेचे उमेदवार धैर्यशील मोहिते पाटील यांनी नागरी तालुका सांगोला येथे प्रचार सभेत व्यक्त केली

तसेच तरुणांसाठी एमआयडीसी उभी करून छोटी छोटी उद्योगधंदे उभा करून रोजगार उपलब्ध करून देऊ व तुम्हा सर्वांच्या साक्षीने माझी उमेदवारी आहे याबाबत मी प्रत्येक तालुक्यात दौरा केला यावेळी तुम्हीच उभे रहा व तुतारी हातात घ्या असे सांगितले त्यामुळे आपण मला आशीर्वाद देऊन विजयी करावी असे मोहिते पाटील यांनी यावेळी सांगितले सुरुवातीस माजी उपसभापती सुनील चौगुले आणि प्रास्ताविक केले तसेच पाण्यासाठी आपला लढा यशस्वी झाला आहे आज त्याची श्री दुसरी घेत आहेत शिवस्मारक उभे करून असे भाजपने सांगितले परंतु केले नाही तर भाजपच्या कोणत्याही उमेदवारास विजयी करू नका असे पाणी संघर्ष समितीचे प्रफुल्ल भैया कदम यांनी यावेळी सांगितली तर पवार साहेबांना नाद कोणी करू नये वये या ८४ वर्षे ते जोमाने काम करतात ध्येय भैया एक उत्तम घटक आहे त्यांना विजयी करा असे मत माजी जिल्हा परिषद अध्यक्ष जय मलाताई गायकवाड यांनी व्यक्त केले तर प्रत्येकाच्या खात्याला पंधरा लाख जमा करतो अशी खोट्या शिवाचं भाजपने दिले व शेतकऱ्यांच्या वर अन्याय केला तो दूर करण्यासाठी मोहिते पाटील यांना विजयी करा असे मत डॉक्टर अनिकेत देशमुख यांनी व्यक्त केले तर भाजप युतीवर आला तर तेथून पुढे निवडणुका होणार नाहीत कारण जिल्हा परिषद तहसील पंचायत समिती महानगरपालिका निवडणुका त्यांनी घेतल्या नाहीत यासाठी भाजपला रोखा व मोहिते पाटील यांना विजयी करा असे मत राष्ट्रवादीचे अध्यक्ष बाबुराव भाऊ गायकवाड यांनी व्यक्त केल

भाजपने अच्छे दिन अनुवासी सांगितले होते आज आले का तर नाही केवळ काँग्रेसवर टीका करायची एवढेच त्यांचे धोरण आहे त्यामुळे शहा वाल्यांना चहाच्या टपरीकडे पाठवा व आपल्या जवळचे म्हणजे अकलूजचे धैर्यशील मोहिते पाटील आहेत त्यांना विजयी करा व लांबच्या उमेदवाराला जवळ करू नका असे मत माजी नगराध्यक्ष प्रबुद्ध चंद्र झपके यांनी व्यक्त केले तर आबासाहेब वसंतराव पाटील यांच्या विचाराचे नाझरे गाव असून ते शेतकरी कामगार पक्षाचे आहेत त्यामुळे इथून वेळ मिळणारा व यात विजयी दादाजी साथ आहे त्यामुळे पवार साहेबांच्या पाठीमागे सर्वांनी उभे राहून धैर्यशील मोहिते पाटील यांना विजयी करा व तुतारी वाजवणारा माणूस हे चिन्हा पुढे बटन दाबून विकासानंद असे मत डॉक्टर बाबासाहेब देशमुख यांनी यावेळी व्यक्त केले आज सांगोला तालुक्यात सर्वत्र विकासाच्या नावाखाली सर्व काही चालू आहेत येथील मान नदीत माझ्या उंची पेक्षाही मोठी खड्डे पडले आहेत आणि कशामुळे यासाठी परिवर्तन घडवून आणावे असे यावेळी डॉक्टर बाबासाहेब देशमुख यांनी व्यक्त केली

# मुंबई आकाशवाणी केंद्रावर युवा कवी , पत्रकार मिलिंद जाधव यांचे भाषण

भिवंडी : भिवंडी तालुक्यातील 'पडघा' या ग्रामीण भागात राहणारे युवा कवी मिलिंद जाधव यांना राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त भाषण सादरीकरण करण्यासाठी मुंबई, आकाशवाणी केंद्रात ''युव वाणीच्या'' कार्यक्रमात आमंत्रित करण्यात आले आहे. विविध सामाजिक कार्यक्रमातून ते आपल्या कवितेच्या मांध्यमातून समाज प्रबोधन करीत असतात. विविध कवी संमेलनात, साहित्य संमेलनात त्यांचा सहभाग असून विविध विषयांवर प्रबोधनात्मक कविता देखील वर्तमापत्रातून प्रकाशित केल्या आहेत. एवढंच नव्हे तर त्यांच्या या अष्टपैलू व्यक्तित्वामुळे एक उत्तम युवा कवी , पत्रकार म्हणून त्यांची ओळख आज इतरांच्या नजरेतून पाहायला मिळते. अनेक कार्यक्रमात ते सूत्रसंचालनाची धुरा सुध्दा सांभाळत असतात. विविध शाळेमध्ये जाऊन शैक्षणिक कविता सादर करीत असतात. यावेळी ग्रामगीता व संत तुकडोजी महाराज त्यांच्या जिवन कार्याची माहिती कवी, पत्रकार मिलिंद जाधव आपल्या भाषणातून सांगणार आहेत. कार्यक्रम अधिकारी नारायण पवार यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम पार पडला .तर कार्यक्रमाचे निवेदन मैथिली जगताप यांनी केले.तर निर्मिती सहाय्यक म्हणुन पूजा जाधव यांनी काम पाहिले . या कार्यक्रमाचे प्रसारण ३० एप्रिल २०२४ रोजी सायंकाळी ठिक ५.३० मिनिटांनी मुंबई आकाशवाणी केंद्रावरून अस्मिता वाहिनीवरून होणार आहे. आजच्या तरुणांनी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या लेखणीतून साकार झालेलं साहित्य वाचलं पाहिजे ,त्यांचे कार्य समजून घेतले पाहिजे. असे युवा कवी , पत्रकार मिलिंद जाधव यांनी बोलतांना सांगितले.



# मतदान जागृतीचा बॅटन घेऊन नवमतदार धावले!; २६ एप्रिलला मतदान केंद्रावर पोहचा; तरुणांचे आवाहन

नांदेड : आम्ही आपण मतदान करावे या प्रचारासाठी धावतोय. तुम्ही फक्त मतदान केंद्रापर्यंत चालत या, असे आवाहन जिल्ह्यातील तरुणांनी नांदेड जिल्ह्यातील नागरिकांना केले आहे. पोलीस परेड ग्राउंडवर मतदान जागृतीचा बॅटन घेऊन नव मतदारांनी रिले स्पर्धेत भाग घेतला.लोकसभा सार्वत्रिक

निवडणूक २०२४ च्या अनुषंगाने नांदेड जिल्हा स्वीप कक्षाने मतदान तरुण युवा मतदारांमध्ये मतदानाचे महत्त्व वाढावे, मतदानाविषयी त्यांना अधिक माहिती व्हावी, त्यांनी मतदान करण्याचे कर्तव्य निर्भीडपणे पार पडावा, यासाठी नांदेड जिल्ह्यातील सोळा तालुक्यात रिले स्पर्धा व गोळा फेक स्पर्धा तरुण नव मतदार युवकांची स्पर्धा घेण्यात आली. त्यांच्या हातात मतदान जनजागृतीचे बॅटन घेऊन हे सर्व तरुण मतदार ३००० एवढ्या मोठ्या संख्येने जमलेल्या प्रेक्षकांना मतदारांना आम्ही जिंकण्यासाठी धावतोय मतदान जनजागृतीसाठी धावतोय तुम्ही पण या देशाची लोकशाही बळकट करण्यासाठी मतदान केंद्राकडे धाव घ्यावी अशा प्रकारचा संदेश या सर्व धावपटूंनी यावेळी दिला.

आकर्षक अशा रंगातील त्यावर मतदानाचे समर्पक असे स्लोगन लिहून बॅटनला सजवण्यात आले होते. या सर्व धावपटूंचं उपस्थितांनी टाळ्यांच्या गजरात कौतुक केले या स्पर्धेला निवडणूक ि

नरीक्षक डॉ.जांगिड यांनी सुरुवात केली. आकर्षक अशा मतदार जागृतीचे संदेश लिहिलेल्या बॅटनचे कौतुक केले. तर दुसऱ्या रिले स्पर्धेला जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांनी सुरुवात करून दिली. तर महिला रिले स्पर्धेची सुरुवात जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी तथा स्वीप जिल्हा नोडल अधिकारी मिनल करनवाल यांनी करून दिली. याप्रसंगी जिल्हा पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका आयुक्त डॉ. महेश कुमार डोईफोडे उपस्थित होते. या स्पर्धेत मुलांमध्ये प्रथम क्रमांक हदगाव तालुक्यातील संघाने पटकावला, तर द्वितीय क्रमांक बिलोली या तालुक्यातील संघाने पटकावला. तर तृतीय क्रमांक कंधार या तालुक्यातील संघाने पटकावला.

महिला रिलेमध्ये कंधार या तालुक्यातील संघाने प्रथम क्रमांक तर किनवट या तालुक्यातील संघांनी द्वितीय क्रमांक तर देगलूर या तालुक्यातील संघाने तृतीय क्रमांक पटकावला. यावेळी गोळाफेक स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेचें सुद्धा आगळे वेगळे वैशिष्ट्य म्हणजे गोळ्यावर ते तजढए असा संदेश पेंट केला होता. त्यामुळे दोन्हीही स्पर्धा




या आगळ्यावेगळ्या जागृतीने ओळखल्या गेल्या. या स्पर्धेचे पंच म्हणून प्रलोभ कुलकर्णी, सुशील कुरडे, खोकले बाबुराव कुलूपवाड, मोहम्मद खालिक, वैभव दमकुंडवार, गोविंद पांचाळ, ज्ञानेश्र्वर सोनसळे, शक्ती घोडगे, शिवकांता देशमुख, यांच्यासह अनेक पंचांनी काम पाहिले. स्पर्धा यशस्वी करण्यासाठी जिल्हा स्विप टीमचे रवी ढगे, डॉ राजेश पावडे, सारिका आचमे, अशा घुगे, सुनील मुत्तेपवार, बालासाहेब कचवे सुनील आलूरकर, दीपक भांगे, संतोष किसवे पाटील यांनी परिश्रम घेतले.

# मुंबईसह महाराष्ट्राला मतदानाच्या टक्केवारीत अग्रस्थानी आणावे : राज्य विशेष निरीक्षक धर्मेंद्र सिंग गंगवार




मुंबई : महाराष्ट्राची आणि देशाची आर्थिक राजधानी असलेल्या मुंबई शहरात मतदानाची टक्केवारी वाढवून मतदानात मुंबई उपनगर जिल्ह्याबरोबरच महाराष्ट्रालाही अग्रस्थानी आणावे, असे आवाहन लोकसभा निवडणुकीसाठी भारत निवडणूक आयोगाने नियुक्त केलेले राज्य विशेष निरीक्षक धर्मेंद्रसिंग गंगवार यांनी येथे केले. लोकसभा निवडणुकीसाठी मुंबई उपनगर जिल्ह्यातील चारही लोकसभा मतदारसंघात २० मे रोजी मतदान प्रक्रिया पार पडणार आहे. शुक्रवार २६ एप्रिल २०२४ पासून उमेदवारी अर्ज भरण्याची प्रक्रिया सुरू होणार आहे. लोकसभेच्या या चारही मतदारसंघात मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी कार्यालयातर्फे 'स्वीप'च्या माध्यमातून वेगवेगळे उपक्रम राबविण्यात येत आहेत. या उपक्रमांतर्गत मुलुंड येथील महाकवी कालिदास नाट्यमंदिरात मुंबई महानगरपालिकेच्या 'टी' विभागांतर्गत येणाऱ्या अंगणवाडी सेविका, आरोग्य सेविका, स्वच्छता कर्मचारी, मतदान केंद्रस्तरीय (बीएलओ) आणि क्षेत्रीय अधिकाऱ्यांसाठी 'क्षमता विकास आणि जीवन बदलण्याची कला' या विषयावरील २३ व्या प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी विशेष निरीक्षक श्री. गंगवार बोलत होते. जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी राजेंद्र क्षीरसागर, अपर जिल्हाधिकारी डॉ. किरण महाजन, निवडणूक निर्णय अधिकारी दादाराव दातकर, 'स्वीप'चे नोडल अधिकारी डॉ. सुभाष दळवी, तहसीलदार प्रिया जांबळे-पाटील, स्वीपचे सल्लागार भारत मराठे उपस्थित होते. विशेष निरीक्षक श्री. गंगवार म्हणाले की, लोकशाहीच्या सक्षमीकरण आणि संवर्धनासाठी मतदारांचे योगदान महत्वाचे आहे. यासाठी आपण सर्वांनी संयुक्तरित्या मतदान प्रक्रिया सुलभ होण्यासाठी व मतदाराला मतदान प्रक्रिया आनंददायी वाटेल यासाठी प्रयत्न करावे.

मतदान प्रक्रिया शांततामय वातावरण, कमी वेळेत आणि पारदर्शक पद्धतीने होईल यासाठी मतदान केंद्रांवर आवश्यक मूलभूत सोयीसुविधा उपलब्ध करून देण्याच्या सूचना त्यांनी यावेळी दिल्या. रीच वन टीच वन धोरणाचा अवलंब करावा राज्यात कायदा आणि सुव्यवस्था चांगली आहे. येथे उपस्थित सर्व मतदार दूतांनी मतदारांमध्ये जागृती करावी व त्यांनीही इतरांचे मतदान करण्यासंदर्भात प्रबोधन करावे या पद्धतीने मतदानाचा टक्का वाढविण्यास मदत होईल. 'चुनाव का पर्व - देश का गर्व' हे घोषवाक्य सार्थकी ठरविण्यात आपला सहभाग खूप महत्वाचा आहे. राष्ट्र निर्माणाच्या प्रक्रियेत सर्वांची भागीदारी महत्वाची असून आपण आपली जबाबदारी नक्कीच पार पाडाल, असा विश्र्वास विशेष पोलीस निरीक्षक एन. के. मिश्रा यांनी यावेळी व्यक्त केला.मतदान जनजागृतीत समूहाचे योगदान मोलाचे - जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी राजेंद्र क्षीरसागर

मुंबई उपनगर जिल्ह्यातील मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी स्थानिक पातळीवर मतदानाच्या अधिकाराबाबत सविस्तर माहिती मतदारांना देणे आणि प्रत्यक्ष मतदानाच्या दिवशी मतदान केंद्रावर घेऊन जाणे इत्यादी महत्त्वपूर्ण कामांची जबाबदारी मतदान केंद्र जनजागृती समूह (बूथ अवरनेस ग्रुप) यांच्यावर सोपविण्यात आली आहे. त्यामुळे मतदानाच्या राष्ट्रीय टक्केवारीच्या सरासरीमध्ये मुंबई उपनगर जिल्ह्याची मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी मतदान केंद्र जनजागृती समूहाचे योगदान मोलाचे असणार आहे. या कामात आपण सर्वांनी सर्वतोपरी सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी श्री. क्षीरसागर यांनी यावेळी केले.

निवडणुकीचे काम करण्यात आणि मतदाराला मतदान केंद्रापर्यंत घेऊन जाण्यात काहीही समस्या आल्यास त्या सोडविण्यासाठी निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालय सहकार्य करेल. मतदाराचे नाव आणि केंद्राची माहिती मिळविण्यासाठी व्होटर हेल्पिंग पचा वापर करावा. भारत निवडणूक आयोगाच्या .शलळ.सीें.ळप या संकेतस्थळावर उमेदवाराची सर्व माहिती उपलब्ध असणार आहे. तसेच १९५० या हेल्पलाईनवर संपर्क समस्यांचे निराकरण करण्यात येणार आल्याचेही श्री. क्षीरसागर यांनी सांगितले.

७५ टक्के मतदानासाठी घेतली शपथ

'मी स्वतः मतदान करणार. मित्र मंडळी आणि परिवाराच्या सदस्यांना मतदान करण्यासाठी आग्रह धरणार. तसेच आपल्या क्षेत्रातील प्रत्येक कुटुंबाला मतदान केंद्रापर्यंत घेऊन जाण्यासाठी सक्रिय सहभाग घेणार असल्याचे सांगून अंगणवाडी सेविका, आरोग्य सेविका, पर्यवेक्षक, क्षेत्रीय कर्मचारी आणि अधिकारी यांनी मुंबई उपनगर जिल्ह्यात ७५ टक्के मतदान करण्यासाठी सकारात्मक आणि उत्साहपूर्वक काम करणार असल्याची प्रतिज्ञा यावेळी घेतली.

एक मत लोकशाहीत परिवर्तन घडवेल

लोकशाहीच्या संवर्धनासाठी प्रत्येक मत हे महत्वपूर्ण आहे. सकारात्मक आणि एकत्रितरित्या काम केल्यास सोमवार २० मे २०२४ रोजी मतदानाचा टक्का वाढविण्यासाठी नक्की मदत होईल. मुंबई उपनगरात एकत्रित ५२२१ अंगणवाड्या आहेत, त्याअंतर्गत सेविका आणि मदतनीस एकूण १०,४४२ जण आहेत. ४५०० आरोग्य सेविका व आशा वर्कर आहेत. स्वच्छ मुंबई प्रबोधन अभियानाच्या ८२३ स्थानिक सामाजिक संस्थांचे सफाई मित्र १०,२३६ आहेत. ८३०० बचतगटाचे ८० हजारांपेक्षा जास्त सदस्य आहेत. विविध विभागातील सुमारे ८ हजार क्षेत्रीय कर्मचारी (बीएलओ) आहेत. असे एकूण अंदाजे एक लाख कर्मचारी मतदार दूत आहेत. मुंबई शहर आणि उपनगरची मतदार संख्या जवळपास ९८ लाखाच्या आसपास आहेत. आपण कामांची विभागणी करून काम केल्यास प्रत्येक कुटुंबातील व्यक्तीला मतदान केंद्रापर्यंत घेऊन जाण्यास आपण यशस्वी ठरणार असल्याचे स्वीपचे विशेष समन्वय अधिकारी डॉ. दळवी यांनी सांगितले.

मुंबईत मतदानाची टक्केवारी वाढविण्याचे ध्येय समोर ठेवून एक लाख कर्मचाऱ्यांना डॉ. दळवी यांनी यावेळी मार्गदर्शन केले. त्यांनी मतदारांशी सकारात्मक पद्धतीने कसे वागावे तसेच त्यांना मतदान करण्यासाठी प्रवृत्त करण्याचा आत्मविश्र्वास उपस्थितांमध्ये निर्माण केला. यावेळी भारत निवडणूक आयोगाचे केंद्रीय निरीक्षक श्री. गंगवार यांनी डॉ. दळवी यांच्या कार्याचा गौरव केला. जिल्हाधिकारी श्री. क्षीरसागर यांच्यासह सर्व वरिष्ठ अधिकाऱ्यांनी या कार्यक्रमाची अनुभुती घेत कार्यक्रम यशस्वी झाल्याचे गौरवोद्गार काढले.

# सिईओ आव्हाळे यांच्या धाडसी निर्णयामुळे कासेगाव प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेस मिळणार संजीवनी.,!

## सुरळीत योजना राहणेसाठी सोलार चा आधार..!



सोलापूर/प्रतिनिधीः जिल्हा परिषदेच्या प्रशासक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी मनिषा आव्हाळे यांच्या धाडसी निर्णयामुळे कासेगाव प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेस संजीवनी मिळणार आहे. रखरखत्या उन्हात आज सिईओ मनिषा आव्हाळे यांनी १२ गावच्या कासेगाव प्रादेशिक योजनेची उन्हात फिरून पाहणी केली. कासेगाव व शिरभावी प्रादेशिक पाणी पुरवठा योजनांची पाहणी केली. कासेगाव योजनेची लाईट बीलाची कटकट बंद करणे साठी सोलार चा पर्याय देण्याच्या सुचना सिईओ मनिषा आव्हाळे यांनी दिल्या.

या प्रसंगी ग्रामीण पाणी पुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता सुनील कटोकधोंड, सांगोला चे उप अभियंता सुरेश कमळे, उप अभियंता पांडव, बांधकाम विभागाचे उप अभियंता लवटे, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण चे उप अभियंता माने यांचे सहप्रादेशिक पाणी पुरवठा योजने अंतर्गत येत असलेले गावांचे ग्रीमसेवक या दौरीच उपस्थित होते. सिईओ मनिषा आव्हाळे यांनी आज जलजीवन मिशन च्या कामांना गती देत असतानाच सध्या पाणी टंचाईचा सामना करीत असलेल्या कासेगाव प्रादेशिक योजना पुर्ववत करणे साठी त्यांनी धाडसी निर्णय घेत पाणी पुरवठा योजने साठी सोलार चा पर्याय देणेसाठी नियोजन करणेचे सुचना दिल्या.

राष्ट्रीय मगा मार्गामुळे कासेगाव प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेस काही दिवस अडचण निर्माण होणार होती. सिईओ आव्हाळे यांनी वाखरी तळाजवळ पाणी पुरवठा योजनेस भेट देऊन राष्ट्रीय महामार्गाचे अधिकारी यांचेशी संवाद साधून नियोजन केलेमुळे शिफ्टींग चे काम जलद गतीने होणार आहे. हे काम महामार्गाकडून वेळेत करणेचे सुचना दिल्या. कार्यकारी अभियंता सुनील कटकधोंड यांनी कासेगाव प्रादेशिक पाणी पुरवठा योजना जलजीवन मिशम मध्ये समाविष्ठ केली असल्याचे सांगितले.

शिरभावी उपसा सिंचन योजनेची होणार वेळेत दुरूस्ती..!

शिरभावी उपसा सिंचन योजनेत दीड किलोमिटर अंतरावरील पाईप लाईनचे काम जिल्हा परिषदेचे परवानगी साठी थांबले होते. सिईओ आव्हाळे यांचे लक्षात येताच त्यांनी एका दिवसात मान्यता देऊन तात्काळ कामे सुरू करणेचे सुचना दिल्या. या योजनेतील जॅकवेल ची कामे व पंप हाऊस दुरूस्ती ची कामे वेळेत पुर्ण करून नवीन पंप बसविणेचे सुचना दिल्या.

# बनावट चेक, सह्यांचा वापर करून शिक्षण विभागाचे ४७ लाख रुपये लंपास केल्याप्रकरणी मरीन ड्राईव्ह पोलिस ठाणे येथे गुन्हा दाखल

मुंबई, : बनावट चेक, सह्यांचा वापर करून शिक्षण विभागाचे ४७ लाख रुपये लंपास केल्याप्रकरणी मरीन ड्राईव्ह पोलिस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस अधिक तपास करीत असल्याचा खुलासा शालेय शिक्षण व क्रीडा विभागाने केला आहे.

बँकेचे व्यवहार सी.टी.एस. प्रणालीद्वारे होतात. त्यामुळे या बनावट धनादेशाची तपासणी संबंधित बँकांच्या अधिकारी/कर्मचारी यांनी योग्य प्रकारे केली नसल्याचे दिसून येते. त्यामुळे याबाबतची जबाबदारी संबंधित बँकांची आहे. या १० बनावट धनादेशाद्वारे काढण्यात आलेली रक्कम ४७ लाख ६० हजार रुपये (रु. ४७,६०,०००/-) आरबीआयच्या मार्गदर्शक सूचनांच्या अनुषंगाने बँक ऑफ महाराष्ट्र, मंत्रालय शाखेने, राज्य क्रीडा विकास निधीच्या बचत खात्यामध्ये दि.२४ एप्रिल २०२४ रोजी जमा करुन भरपाई केली आहे.

राज्यातील दर्जेदार खेळाडूंना आंतरराष्ट्रीय स्पर्धा पूर्व प्रशिक्षण / परदेशी क्रीडा साहित्य आयात करणे / आंतरराष्ट्रीय स्पर्धेला जाण्यासाठी खेळाडूंना आर्थिक सहाय्य करणे इ, करिता अर्थसहाय्य राज्य क्रीडा विकास निधीतून करण्यात येते. त्यासाठी शालेय शिक्षण व क्रीडा विभागाचे राज्य क्रीडा विकास निधीचे बचत खाते बँक ऑफ महाराष्ट्र, मंत्रालय, मुंबई या शाखेत कार्यरत आहे.

कोविड-१९ महामारीमुळे उद्भवलेल्या परिस्थितीमुळे हे बचत खाते, सह संचालक, क्रीडा व युवक सेवा संचालनालय, पुणे व उप सचिव / सह सचिव शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांच्या संयुक्त नावाऐवजी केवळ उप सचिव (क्रीडा), शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्या स्वाक्षरीने कार्यान्वित करण्याचे शाखा व्यवस्थापक, बँक ऑफ महाराष्ट्र, मंत्रालय शाखा यांना दि.०३.०९.२०२० व दि.३०.०५.२०२२ च्या पत्रान्वये कळविण्यात आले होते. कोविडचा प्रादूर्भाव सुरु झाल्यापासून, या खात्यातून धनादेशाऐवजी आर.टी.जी.एस मार्फत व्यवहार करण्यात आले असून कोणत्याही खेळाडूस/संस्थेस धनादेश देण्यात आलेले नाहीत.

बचत खात्यातून दिनांक ०२/०३/२०२४ रोजी एकूण १० बनावट धनादेशाद्वारे दोन अधिकारी यांच्या बनावट स्वाक्षरी करून एकूण रक्कम रू. ४७,६०,०००/- काढण्यात आली आहे. ही बाब बँक ऑफ महाराष्ट्रच्या मंत्रालय शाखेच्या अधिकाऱ्यांच्या तसेच विभागाच्या अधिकाऱ्यांच्या दि.०४.०३.२०२४ रोजी निदर्शनास आली.

या धनादेशाच्या मूळ प्रती विभागातच उपलब्ध असल्याने हे धनादेश बनावट असल्याचे स्पष्ट झाले. तसेच या धनादेशांच्या फोटोप्रतींचे अवलोकन केले असता, ते महाराष्ट्र राज्याबाहेरील कोलकाता व चेन्नई या शहरांतील वेगेवेगळ्या बँकेमध्ये वटल्याचे व या धनादेशांवर दोन अधिकाऱ्यांच्या बनावट संयुक्त स्वाक्षऱ्या असल्याचे निदर्शनास आले.

# मतदान जागृतीचा बॅटन घेऊन नवमतदार धावले!

नांदेड : आम्ही आपण मतदान करावे या प्रचारासाठी धावतोय. तुम्ही फक्त मतदान केंद्रापर्यंत चालत या, असे आवाहन जिल्ह्यातील तरुणांनी नांदेड जिल्ह्यातील नागरिकांना केले आहे. पोलीस परेड ग्राउंडवर मतदान जागृतीचा बॅटन घेऊन नव मतदारांनी रिले स्पर्धेत भाग घेतला.




लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ च्या अनुषंगाने नांदेड जिल्हा स्वीप कक्षाने मतदान तरुण युवा मतदारांमध्ये मतदानाचे महत्त्व वाढावे, मतदानाविषयी त्यांना अधिक माहिती व्हावी, त्यांनी मतदान करण्याचे कर्तव्य निर्भीडपणे पार पडावा, यासाठी नांदेड जिल्ह्यातील सोळा तालुक्यात रिले स्पर्धा व गोळा फेक स्पर्धा तरुण नव मतदार युवकांची स्पर्धा घेण्यात आली. त्यांच्या हातात मतदान जनजागृतीचे बॅटन घेऊन हे सर्व तरुण मतदार ३००० एवढ्या मोठ्या संख्येने जमलेल्या प्रेक्षकांना मतदारांना आम्ही जिंकण्यासाठी धावतोय मतदान जनजागृतीसाठी धावतोय तुम्ही पण या देशाची लोकशाही बळकट करण्यासाठी मतदान केंद्राकडे धाव घ्यावी अशा प्रकारचा संदेश या सर्व धावपटूंनी यावेळी दिला.

आकर्षक अशा रंगातील त्यावर मतदानाचे समर्पक असे स्लोगन लिहून बॅटनला सजवण्यात आले होते. या सर्व धावपटूंचे उपस्थितांनी टाळ्यांच्या गजरात कौतुक केले या स्पर्धेला निवडणूक निरीक्षक डॉ.जांगिड यांनी सुरुवात केली. आकर्षक अशा मतदार जागृतीचे संदेश लिहिलेल्या बॅटनचे कौतुक केले. तर दुसऱ्या रिले स्पर्धेला जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांनी सुरुवात करून दिली. तर महिला रिले स्पर्धेची सुरुवात जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी तथा स्वीप जिल्हा नोडल अधिकारी मिनल करनवाल यांनी करून दिली. याप्रसंगी जिल्हा पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका आयुक्त डॉ. महेश कुमार डोईफोडे उपस्थित होते. या स्पर्धेत मुलांमध्ये प्रथम क्रमांक हदगाव तालुक्यातील संघाने पटकावला, तर द्वितीय क्रमांक बिलोली या तालुक्यातील संघाने पटकावला. तर तृतीय क्रमांक कंधार या तालुक्यातील संघाने पटकावला.महिला रिलेमध्ये कंधार या तालुक्यातील संघाने प्रथम क्रमांक तर किनवट या तालुक्यातील संघांनी द्वितीय क्रमांक तर देगलूर या तालुक्यातील संघाने तृतीय क्रमांक पटकावला. यावेळी गोळाफेक स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेचें सुद्धा आगळे वेगळे वैशिष्ट्य म्हणजे गोळ्यावर ते तजढए असा संदेश पेंट केला होता. त्यामुळे दोन्हीही स्पर्धा या आगळयावेगळया जागृतीने ओळखल्या गेल्या. या स्पर्धेचे पंच म्हणून प्रलोभ कुलकर्णी, सुशील कुरडे, खोकले बाबुराव कुलूपवाड, मोहम्मद खालिक, वैभव दमकुंडवार, गोविंद पांचाळ, ज्ञानेश्र्वर सोनसळे, शक्ती घोडगे, शिवकांता देशमुख, यांच्यासह अनेक पंचांनी काम पाहिले. स्पर्धा यशस्वी करण्यासाठी जिल्हा स्विप टीमचे रवी ढगे, डॉ राजेश पावडे, सारिका आचमे, अशा घुगे, सुनील मुत्तेपवार, बालासाहेब कचवे सुनील आलूरकर, दीपक भांगे, संतोष किसवे पाटील यांनी परिश्रम घेतले.

# मतदार जागरुकतेसाठी प्रशिक्षण शिबिर

मुंबई : मुंबई शहर जिल्ह्यामध्ये मतदानाची टक्केवारी वाढविण्याच्या दृष्टीने जनजागृतीसाठी स्वीप (डतएएझ) अर्थात मतदार जागरूकता आणि सहभाग कार्यक्रमांतर्गत विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. या उपक्रमांतर्गत नुकतेच भायखळा विधानसभा मतदार संघात दोन प्रशिक्षण शिबिर घेण्यात आली.लोकसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४ च्या पार्श्र्वभूमीवर भारत निवडणूक आयोगाने दिलेल्या सूचनेनुसार भायखळा येथील अण्णाभाऊ साठे सभागृहात बृहन्मुंबई महानगरपालिका शिक्षण मंडळाच्या शिक्षकांसाठी आयोजित शिबिरात बृहन्मुंबई महानगरपालिका शिक्षण मंडळाच्या अखत्यारीतील शाळांमधील सुमारे ७०० शिक्षक या प्रशिक्षणात सहभागी झाले. प्रशिक्षणार्थींनी मतदानाची टक्केवारी वाढावी, यासाठी सूक्ष्म नियोजन कसे करावे, मतदारांना मतदानासाठी प्रेरित कसे करावे याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

भायखळा विधानसभा मतदार संघात आयोजित दुसऱ्या प्रशिक्षण शिबिरात ३३ क्षेत्रीय अधिकारी, २५५ मतदान केंद्रस्तरीय अधिकारी, ३५ बचत गट कर्मचारी, १५७ अंगणवाडी सेविका, ६७ आरोग्य सेविका, १०५ कार्यालयीन कर्मचारी असे एकूण सुमारे ६५२ कर्मचारी सहभागी झाले. या शिबिरात मतदान केंद्रस्तरीय अधिकारी आणि मतदाता दूत जसे अंगणवाडी सेविका/मदतनीस, आरोग्य सेविका, आशा स्वयंसेविका, स्वच्छता कर्मचारी यांना आवश्यक नेतृत्व कौशल्य, मुंबई शहर जिल्ह्याच्या मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी प्रशिक्षित व प्रेरित करण्यात आले. प्रत्येक प्रशिक्षणार्थींने समूह भावना व लक्ष्यपूर्वक दृष्टिकोनातून २०० कुटुंबांतील मतदारांना कसे जोडावे आणि त्यांना मतदानासाठी कसे प्रेरित करावे, याबाबत माहिती देण्यात आली. प्रत्येक नागरिकाने आपला मतदानाचा हक्क बजावणे किती महत्त्वाचे आहे, त्यामुळे काय फरक पडू शकतो याचे महत्त्व मतदारांना पटवून देण्याविषयी शिबिरात मार्गदर्शन करण्यात आले. मतदानाचा हक्क बजावण्यासंदर्भातील संकल्पपत्र भरून घेणेबाबतही माहिती देण्यात आली.यावेळी भायखळा विधानसभा मतदारसंघाचे सहायक निवडणूक निर्णय अधिकारी कृष्णा जाधव, अतिरिक्त सहायक निवडणूक निर्णय अधिकारी प्रतिभा वराळे, निवडणूक अधिकारी राजेश कंकाळ, उपनिवडणूक अधिकारी निसार खान आदी उपस्थित होते.